# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

प्लॉट नं. आर. ७, छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
पोस्ट बॉक्स : १४०७, फॅक्स : नं. : ९१-२०-२४५२८२९९
✆ ०२०-२४५२८१००, २४५२८२०० ● E-MAIL : admin@msamb.com
Web Site : www.msamb.com


जाक्र. कृपमं/बास/पीएमओ/कार्यक्रम/2406/२०२५, पुणे, दि. ०८/१०/२०२५

प्रति,

**सचिव,**
कृषि उत्पन्न बाजार समिती, (सर्व)

**विषय :- माननिय पंतप्रधानांच्या कार्यक्रमासाठी बाजार समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि इतर शेतकरी गटांद्वारे शेतकऱ्यांना एकत्रित करुन कार्यक्रमाचे बाजार समितीमध्ये थेट प्रसारण करण्याबाबत.**

**संदर्भ** :- केंद्र शासनाचे पत्र नं. एफ. क्रमांक २२०१६/१७/२०२५ एम. II (एफटीएस-१७४३२०), दि.०७/१०/२०२५.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या देशाचे मा. पंतप्रधान हे कृषि उत्पन्न बाजार समित्या, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि इतर शेतकरी गटांतील शेतकऱ्यांना शनिवार, दि.११/१०/२०२५ रोजी मार्गदर्शन करणार आहेत. याकरिता बाजार समितीने बाजार समितीमधील अधिकारी/कर्मचारी, कार्यक्षेत्रातील लोकप्रतिनिधी तसेच शेतकरी गटातील शेतकऱ्यांना एकत्रित करावयाचे आहे. सदर कार्यक्रम जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सर्व बाजार समित्यांना या कार्यक्रमाचे थेट प्रसारण करणेबाबत केंद्र शासनाने सुचित केले आहे.

या कार्यक्रमाचे अनुषंगाने सर्व बाजार समित्यांनी दि.११/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता या कार्यक्रमाचे बाजार समितीचे स्तरावर २०० ते २५० शेतकऱ्यांच्या उपस्थितीत एलसीडी स्क्रीन / टिव्हीद्वारे थेट प्रसारण करावयाचे आहे. सर्व बाजार समित्यांनी सदर कार्यक्रमाचे दाखविले जाणारे थेट प्रसारण व उपस्थित शेतकरी याप्रमाणे दोन फोटो तसेच कार्यक्रमाबाबतची माहिती तयार करावयाची आहे. या कार्यक्रम वेळापत्रकाची माहिती योग्य वेळी स्वतंत्रपणे कळवली जाईल तसेच लाईव्ह स्ट्रीमिंगसाठी व्हर्च्युअल/वेबकास्ट लिंक लवकरच ई-मेलद्वारे आपणास शेअर केली जाईल. सदर कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर दोन फोटो तसेच कार्यक्रमामध्ये सहभागी शेतकरी (पुरुष आणि महिला स्वतंत्रपणे) यांची संख्या दर्शविणारा अहवाल कृषि पणन मंडळाचे संबंधीत विभागीय कार्यालयाचे ईमेलवर सादर करावा.

(संजय कदम)
**कार्यकारी संचालक**

**प्रत :- विभागीय उपसरव्यवस्थापक,** विभागीय कार्यालय, (सर्व) - आपल्या विभागातील सर्व बाजार समित्यांना सदर कार्यक्रमाचे थेट प्रसारण करणे, कार्यक्रमासाठी २०० ते २५० शेतकऱ्यांची उपस्थिती व आवश्यक ती माहिती सादर करणेबाबत सुचना देवून पाठपुरावा करावा व कार्यक्रमास उपस्थित राहवे. तसेच सदर कार्यक्रमांचे बाजार समितीनिहाय फोटो व उपस्थिती संख्या बाबतचा आपल्या विभागाचा एकत्रित अहवाल मुख्यालयास सादर करावा.